PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Aata Ga Baya
Year: 2011

Song: Dohale purv kase
Lyricist: Guru Thakur & Anil Jagtap

डोहाळे पुरवू कसे
तुझे डोहाळे पुरवू कसे
डोहाळे पुरवू कसे
तुझे डोहाळे पुरवू कसे
सुख सुमनांच्या मखमालीवर
आनंदाचा घन बरसे
दूषित मनाच्या नभोमंडपी
आज सुखाचा चंद्र हसे
आंबट चिंबट चिंचा बोरे
तुज वाटे का खावे असे
बाळकृष्ण की लक्ष्मी सुंदर
तव उदरी जे गोड हसे
अधीर असे स्वप्न जसे
आज तुझ्या नयनात वसे
डोहाळे पुरवू कसे
तुझे डोहाळे पुरवू कसे
डोहाळे पुरवू कसे
तुझे डोहाळे पुरवू कसे

होणार तू माऊली या जगी
भाग्य मोठे तुला लाभले
दंगा नको पोरी पिंगा नको
टाक हळुवार तू पाऊले
हे मारावा वाटे सुट्टा
मग पान विडा कलकत्ता
अन् खिमा पाव तो ढाब्यावरचा
द्या आत्ताच्या आत्ता रे
खावीशी वाटते गं
बिर्यानी चिकन करी हे...

द्या मला आणूनी गं
मोसंबी अन् अंगूरी
सांभाळ जरा घे बेताने
तुज वर्ज्य आता गं हे खाणे
होणार तू माता
थांबव आता हे चाळे
डोहाळे पुरवू कसे
तुझे डोहाळे पुरवू कसे
डोहाळे पुरवू कसे
तुझे डोहाळे पुरवू कसे

अरबट चरबट सोडूनी सारे
नाजूक साजूक खावे
कटकट किटकिट भांडण तंटा
सोडून गोड हसावे
गवतावरूनी हिरव्या
तू अनवाणी चालावे
विसरून फुटकळ चिंता
तू नाम हरिचे घ्यावे
उठणे बसणे जिना उतरणे
सगळे जपून करावे
बाळासाठी स्वेटर टोपी
मोजे विणत बसावे
हे झेलू कैसे किती गं
वाटे जीवाला भिती हे...
कोण कुठला पती गं
मचमच ही झाली अती
हे अती नसे सुरवात असे
वागून असे चालेल कसे

सोडून सखे गं धीर
तू करशील घोटाळे
डोहाळे पुरवू कसे
डोहाळे पुरवू कसे
डोहाळे पुरवू कसे
लागले पिसे
जीवाला असे
सुखसुमनांच्या मखमालीवरती
चंद्र सुखाचा हसे
ही पडे जीवाला भूल
सोनपाऊल मला गं दिसे
हां बाळकृष्ण की चिमणा राघव
तव उदरी जो वसे
डोहाळे पुरवू कसे
डोहाळे पुरवू कसे
डोहाळे पुरवू कसे
डोहाळे पुरवू कसे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*